राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल झालेले तक्रार

(गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन सुनावणी)

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४१३ ००१

तक्रार क्रमांक.१३४,१३५,१३६,१३७,१३८,१३९,१४०,१४१,१४२,१४३,१४४,१४५,१४६,१४७,१४८/२०१८
(द्वितीय अपील क्र. २७७, २७९ ,२८१ २८२, २८४, २८५, २७५ ,२८९ ,२७६, २७४, २७३, २७१, २८६, २८८,२८७/२०१७ मध्ये)

श्री.सचिन सुभाष मुर्के,
रा.विरभद्रेश्रवर मंदिराजवळ,
मु.पो.देवणी,जि.लातूर

तक्रारदार

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक ,शिक्षण विभाग ,प्राथमिक,जिल्हा परिषद,लातूर

उत्तरवादी

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी,प्राथमिक,जिल्हा परिषद,लातूर

( सुनावणी दिनांक २८.०४.२०२१)

निर्णय

तक्रारदार यांनी दि.१९.०९.२०१८ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे अनुक्रमे द्वितीय अपील क्र.२७७, २७९, २८१, २८२, २८४, २८५ ,२७५ ,२८९, २७६, २७४, २७३, २७१, २८६, २८८, २८७/२०१७ मध्ये आयोगाने दि.०९.०२.२०१८ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही झाली नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीची गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल तक्रारदार आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसद्वारे कळविण्यात आले. तसेच सदर नोटीस आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आली त्यानुसार आज रोजी प्रकरणात गुगल मीट ॲपद्वारे ऑनलाईन सुनावणी घेण्यात येत आहे. ऑनलाईन सुनावणीसाठी तक्रारदार व प्रथम अपिलीय अधिकारी, उपस्थित आहेत. तर जन माहिती अधिकारी,अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्यावेळी तक्रारदार यांनी आयोगासमोर असे कथन केले की अर्धवट, दिशाभूल करणारी व चूकीची माहिती दिली आहे.

आज रोजी सुनावणीच्यावेळी आयोगासमक्ष उपलब्ध वस्तुस्थितीनुसार कागदपत्रांवरुन व युक्तीवादावरुन आयोग पुढीलप्रमाणे निरीक्षण नोंदवत आहे. केंद्रीय माहिती आयोगाने

CIC/BS/A/2014/002319-A Decisiob date 18.3.2016 या व्दितीय अपील व तसेच राज्य माहिती आयोग खंडपीठ .औरंगाबाद यांनी व्दितीय अपील क्र.०१६२/२०१२ सुनावणी दि.०६.०३.२०१३ दिलेल्या न्यायनिर्णयतील मुददाकडे लक्ष वेधण्यात येत आहे

*29. Hon'ble Punjab and Haryana High Court in case of K K Sharma Vs. State of Haryana [W.P.(C) No.4930 of 2011] in relation to disgruntled employees had observed as follows :*

*"Clearly, the provisions of the RTI Act would not be available to a disgruntled employee seeking information as regards public officials which is otherwise personal in nature on account of furtherance of a personal vendetta.'*

*७. या व पूर्वीच्या काही प्रकरणाच्या अनुषंगाने आयोगाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, अशा प्रकरणी अपिलार्थी संबंधित ज्या कार्यालयाचे अधिकारी तसेच कर्मचारी आहेत त्याच कार्यालयातील माहिती माहिती अधिकारांतर्गत मागतात, बहुतांश प्रकरणामध्ये माहितीची मागणी करण्याऐवजी अपिलार्थी (अधिकार तसेच कर्मचारी ) त्यांच्याशी संबंधित एखाद्या प्रकरणाच्या अनुषंगाने कार्यवाहीची अपेक्षा करतात, तथपि ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. आपण ज्या कार्यालयात काम करतो त्याच कार्यालयातील माहिती माहिती अधिकारातंर्गत मागणे सहसा योग्य ठरत नाही. कारण आपण ज्या कार्यालयात कार्यरत आहोत किंवा होतो त्या कार्यालयात कोणती माहिती आहे किंवा कोणती माहिती नष्ट केली आहे या बाबी अधिकारी तसेच कर्मचारी यांना ज्ञात असतात असे आयोगाचे मत आहे.माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ नुसार प्रत्येक नागरिकास माहितीचा अधिकार प्राप्त झालेला आहे. तथपि शासकीय अधिकारी तसेच कर्मचारी यांना माहिती अधिकाराचा वापर करताना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक ) नियमांचा विसर पडून चालणार नाही असे आयोगाचे मत आहे. विशेष:त अधिकारी तसेच कर्मचारी यांनी माहितीची मागणी करताना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या किंवा संबंधित कार्यालयातील दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम होणार नाही ही बाब प्रामुख्याने विचारात ठेवणे आवश्यक आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधी प्रमुख उदिष्ट नागरिकांना माहिती उपलब्ध करण्याच्या दृष्टीने एक व्यवहार्य शासन प्रणाली निश्चित करणे आहे जेणेकरुन सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजात पारदर्शकता व उत्तरदयित्व निर्माण होईल. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रगटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना जसे शासनाचे कामकाज या बाबी पाहेण आवश्यक आहेत. अत: या दोघांचा मेळ घालणे जरुरी आहे. यामुळे शासन सेवते असलेल्या अधिकारी तसेच कर्मया-यांना माहिती अधिकाराचा वापर करताना ही बाब प्रामुख्याने लक्षात ठेवण्याची महत्वाची जबाबदारी आहे. .*

ही बाब विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने द्वितीय अपिलामध्ये दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही १५ दिवसात करावी, असे त्यांना निर्देशित करण्यात येत आहे. आयोगाने आदेशित

कल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी कार्यवाही करतात हो बाब शिक्षणाधिकारी प्राथमिक विभाग, जिल्हा परिषद लातूर यांनी पहावी व त्यासंदर्भात अहवाल आयोगास १५ दिवसात सादर करावा याकरिता कलम १९(८)(क)१९(७) नुसार प्राप्त अधिकारानुसार शिक्षणाधिकारी प्राथमिक, विभाग, जिल्हा परिषद ,लातूर यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येत आहे. या निर्देशासह विचाराधीन तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त निर्देशासह तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

( दिलीप ल. धारुरकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

जावक क्र. ४०१ दि. २४/१/2022

प्रत :- माहिती तथा कार्यवाही / अंमलबजावणीस्तव अग्रेषित.

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर
२. शिक्षणाधिकारी, प्राथमिक,विभाग, जिल्हा परिषद,लातूर
३. संबंधित जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक ,शिक्षण विभाग ,प्राथमिक,जिल्हा परिषद,लातूर यांना मार्फत शिक्षणाधिकारी, प्राथमिक,विभाग, जिल्हा परिषद,लातूर